RNI No. MAHBIL/2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2014–16

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक १३(५)] बुधवार, जून २५, २०१४/आषाढ ४, शके १९३६ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ३८

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.—महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम आणि महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. ... ... पृष्ठे १ ते २

दिनांक २४ जून २०१४ रोजी माननीय राज्यपाल यांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ह. बा. पटेल,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.**

(माननीय राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २५ जून २०१४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम आणि महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९६० चा १२. १९६५ चा महा. ४६. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम आणि महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी आणि महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (सुधारणा) अधिनियम, २०१४ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

प्रकरण दोन

## महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियमाची सुधारणा

सन १९६० चा अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम २० ची सुधारणा.

२. महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियम याच्या कलम २० मधील, पोट-कलम (१२) च्या खंड (अ) मध्ये, " केवळ समचिकित्सा वैद्यक पद्धतीनेच " या मजकुराऐवजी, " समचिकित्सा वैद्यक पद्धतीने आणि राज्य शासनाने मान्यता दिलेला आधुनिक औषधशास्त्र प्रमाणपत्र पाठ्यक्रम उत्तीर्ण करून त्याद्वारे ग्रहण केलेल्या ज्ञानाच्या व्याप्तीपुरता राज्यात आधुनिक शास्त्रीय वैद्यक (विषमचिकित्सा) पद्धतीने " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६० चा १२.

प्रकरण तीन

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ याची सुधारणा

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम २ ची सुधारणा.

३. महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मध्ये,— १९६५ चा महा. ४६.

(क) खंड (ड) मध्ये,—

(एक) " किंवा बायोकेमिक वैद्यक पद्धती " या मजकुरा ऐवजी, " वैद्यक पद्धती " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, या खंडातील कोणत्याही गोष्टीचा अर्थ, ज्याने राज्य शासनाने मान्यता दिलेला आधुनिक औषधशास्त्र प्रमाणपत्र पाठ्यक्रम उत्तीर्ण केला असेल असा, महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियमाच्या कलम २च्या खंड (१६) मध्ये व्याख्या केलेला नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी सोडून, असा लावला जाणार नाही ;";

(ख) खंड (ह) मध्ये, " वैद्यक व्यवसायींचे नोंदणीपुस्तक " या मजकुरानंतर, " आणि त्यामध्ये अनुसूचीच्या नोंद २८ मध्ये समाविष्ट केलेल्या नोंदणीकृत वैद्यक व्यवसायींकरिता परिषदेकडून ठेवण्यात येईल अशा स्वतंत्र नोंदणीपुस्तकाचा समावेश होईल " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम १० ची सुधारणा.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम १० मधील, खंड (क) मध्ये, " वैद्यक व्यवसायींच्या " या मजकुराच्या अगोदर, "अनुसूचीच्या नोंद २८ मध्ये समाविष्ट केलेल्या नोंदणीकृत वैद्यक व्यवसायींसह" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या अनुसूचीची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये, नोंद २७ नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :—

"२८. ज्याने राज्य शासनाने मान्यता दिलेला आधुनिक औषधशास्त्र प्रमाणपत्र पाठ्यक्रम उत्तीर्ण केला असेल असा, महाराष्ट्र समचिकित्सा वैद्यक व्यवसायी अधिनियमाच्या कलम २च्या खंड (१६) मध्ये व्याख्या केलेला नोंदणीकृत व्यवसायी.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.